अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

गणेशोत्सवाच्या सर्व गणेश भक्तांना हार्दिक शुभेच्छा!

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 28 ऑगस्ट 2025 | वर्ष 11 वे | अंक 02 रा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# नेवजाबाई भैया हितकारिणी सार्वजनिक गणेश मंडळाचा बाप्पा मंडपात विराजमान

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्राच्या रांगड्या मराठमोळ्या संस्कृतीतील महत्त्वाचा सण म्हणून गणेशोत्सवाला अनन्य साधारण महत्त्व आहे. देशाच्या बहुतांश भागांत गणेशोत्सव हा जवळजवळ राष्ट्रीय महोत्सव म्हणूनच साजरा केला जातो. विघ्नहर्त्या गणरायाच्या उत्सवाची प्रतीक्षा आबालवृद्धांना वर्षभर लागून असते. महाराष्ट्रात गणेशोत्सवाचे महत्त्व, महात्म्य आणि परंपरा अनन्य साधारण आहे. बुधवार २७ ऑगस्ट रोजी श्री गणेश चतुर्थी ला लंबोदर अनेक सार्वजनिक गणेश मंडपात विराजमान झाले. तसेच घरगुती गणेशमूर्ती विराजमान झाल्या आहेत. गणपती बाप्पा मोरया.. मंगलमूर्ती मोरया.. असा जयघोष करीत, गणेश मुर्तीकाराच्या घरासमोर भक्तांनी केलेली गर्दी, चार चाकी खाजगी वाहनातून जाणारे घरगुती गणपती, गाडीतील स्पीकरवर ऐकू येणारी गणेश गीते, तर दुसरीकडे ढोल ताशांसह विविध वाद्यांचा गजर, यामुळे बुधवारी संपूर्ण ब्रह्मपुरी नगरी गणरायाच्या आगमनाने दुमदुमून गेली होती.



(नेवजाबाई भैया हितकारिणी सार्व. गणेश मंडळाची गणपती बाप्पाची आकर्षक मुर्ती)

हिंदू धर्मात श्रीगणेशाला आराध्य दैवत मानले जाते. गणपती म्हणजे बुद्धी-समृद्धी सौभाग्याची देवता, सुखकर्ता, विघ्नहर्ता, १४ विद्या व ६४ कलांचा अधिपती असलेल्या विघ्नहर्ता गणरायाची स्थापना भाद्रपद शुद्ध चतुर्थीदिनी म्हणजे बुधवारला तालुक्यात झाली आहे. १० दिवसांच्या या मंगलमय सोहळ्याला बुधवारपासून प्रारंभ झाला आहे. ब्रह्मपुरी शहर व तालुक्यातील सार्वजनिक गणेश मंडळाच्या मंडपामध्ये गणपती बाप्पा मोठ्या थाटात विराजमान झाले आहेत.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून जोरात तयारी सुरू आहे. गणेशमुर्तींना साजेसा देखावा करण्यासाठी दिवसरात्र एक करणारे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते यंदा उत्सवाच्या देखाव्यातून सामाजिक संदेश देणार आहेत. नेवजाबाई भैय्या हितकारिणी सार्वजनिक गणेश मंडळाचे मंडपात मोठ्या भक्तीभावाने बाप्पाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना सकाळी ९.३० वाजता माजी नगरसेवक तथा प्रसिद्ध उद्योजक गौरव भैय्या व आशिता भैय्या यांच्या शुभहस्ते करण्यात आली. ब्रह्मपुरी शहर व तालुका भक्ती सागरात आकंठ बुडाला आहे. या मंडळामध्ये

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# निष्ठूर नियतीच्या डावामुळे दोन निरागस मुली झाल्या पोरक्या

ब्रह्मपुरी / महेश पिलारे

माय अंथरुणावर खितपत पडली होती. त्या दोघी तिच्या जवळून काही केल्या हटत नव्हत्या. तिची प्रकृती अधिकच खालावली. त्यामुळे तिला ब्रम्हपुरीतील ख्रिस्तानंद रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु निष्ठूर नियतीच्या मनात काही वेगळेच होते. घरातील कर्ता पुरुष व मुलींचं बाप गेल्यानंतर तिने मोठ्या खंबीर पणे उभे राहून स्वाभीमानाने जगण्यासाठी संघर्ष केला. पण दोन दिवसांच्या आजाराशी झुंज दिल्यानंतर मातेचा रुग्णालयात मृत्यू झाला. तो बैल पोळ्याचा दिवस होता. क्रूर नियतीने डाव साधत कोवळ्या वयातील त्या दोन्ही मुलींचे दोन महिन्यांपूर्वीच बाप नावाचे छत्र हिरावले. बापा पाठोपाठ अवघ्या दोन महिन्यानंतर नियतीने आईचा बळी घेतला. त्या दोन्ही मुलीं मात्र मायबाप सोडून



गेल्यामुळे पोरक्या झाल्या.

ब्रह्मपुरी तालुक्यातील हाकेच्या अंतरावर असलेल्या अऱ्हेर नवरगाव येथील रहिवासी वसंता ठेंगरे. त्यांना एक मुलगा तुषार. तुषार चे गावातीलच वैशाली नामक युवतीशी विवाह झाला. त्यांचा प्रेमाचा संसार चांगला फुलू लागला. त्यांच्या संसाराच्या वेलीला दोन कळ्या उमलल्या. प्राजक्ता आणि शुभ्रा. प्राजक्ता ६ तर शुभ्रा २ वर्षाची. घरी पोट भरेल इतकी शेती. त्यामुळे हातावर आणणे आणि पानावर खाणे ही नित्याची त्यांची परिस्थिती. सर्व काही सुरळीत सुरू असताना, अचानक जून महिन्यात तुषार ठेंगरे यांचा करून मृत्यु झाला. घरातील कर्ता पुरुष व मुलींचं बाप गेल्यानंतर वैशालीने मोठ्या खंबीरपणे उभे राहून स्वाभीमानाने जगण्यासाठी संघर्ष सुरू केला. मिळेल ते काम करणे व घर चालविणे. घरी म्हातारे सासू, सासरे व दोन लहान मुली हेच तिचं सगळं जग होतं.

पती तुषारच्या निधनाच्या दुःखातून सावरत असताना, दोन महिन्यानंतर २० ऑगस्ट २०२५ ला वैशाली अचानक आजारी पडली. घरीच

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## समाजसेवी संस्थांनी मदतीसाठी पुढे यावे

**ब्रह्मपुरी तालुक्यातील स्वयंसेवी संघटना, राजकीय पक्ष किंवा समाजातील दानशूर व्यक्तिमत्त्वांनी मदतीचा हात दिल्यास व शिक्षणाचे पालकत्व स्वीकारल्यास दोन्ही निरागस मुलींना जगण्यासाठी मोठा आधार होणार आहे. या सत्कार्यासाठी ब्रम्हपुरी तालुक्यातील नागरिकांनी समोर येऊन थेट कुटुंबीय किंवा आमच्या प्रतिनिधीशी संपर्क साधून सहकार्य करावे.**



# संपादकीय...

## हिंसाचाराचे फॅड

गेल्या आठवड्यात गुजरातची राजधानी अहमदाबादमधील शाळेत आठवीच्या विद्यार्थ्यांने दहावीच्या विद्यार्थ्यांवर चाकूहल्ला करत त्याची हत्या केल्याची भीषण घटना घडली होती. त्यानंतर दोनच दिवसांत गुजरातच्या दुसऱ्या जिल्ह्यातही आठवीच्या एका विद्यार्थ्याने दहावीच्या विद्यार्थ्यावर चाकूहल्ला केला, अलीकडेच बेंचवर बसण्याच्या वादातून दहावीतील विद्यार्थ्यांची दोन अल्पवयीन मित्रांनी हत्या करण्याची धक्कादायक घटना नाशिक येथे घडली होती, तर गेल्या महिन्यात क्रिकेटच्या वादातून अहिल्यानगरमध्ये आठवीतील विद्यार्थ्यांने दहावीतील विद्यार्थ्यांची हत्या केली होती. छत्तीसगडमधील रायपूर, बिलासपुरसारख्या अनेक शहरांमध्ये शाळकरी मुलांकडून अंदाधुंद चाकू हल्ल्यांच्या घटना घडत आहेत आणि त्याचे व्हिडीओ व्हायरल होत आहेत, तर कुठे रक्ताने माखलेल्या विद्यार्थ्यांचे फोटो समोर येत आहेत.

उत्तराखंडमध्ये नववीच्या विद्यार्थ्याने गृहपाठ पूर्ण न केल्याबद्दल रागावलेल्या शिक्षकावर देशी बनावटीच्या पिस्तुलातून गोळी झाडून त्याला जखमी केले. देशभरात शालेय विद्यार्थ्यांमध्ये हिंसाचार इतका का वाढत आहे? शाळा-महाविद्यालयांत चाकूचा इतका वापर का होत आहे? या सगळ्यामागे सोशल मीडियावर पोस्ट होणाऱ्या रील्सचाही परिणाम आहे. व्यावसायिक गुन्हेगारांपासून ते हौशी बढाईखोरांपर्यंत, सर्वांना व्हिडीओ बनवण्याचा आणि ते सर्वत्र पोस्ट करण्याचा इतका नाद लागलाय की, ते स्वत:च्या गुन्ह्यांचे व्हिडीओ पोस्ट करत आहेत. अशा व्हिडीओंवर कारवाई करणे पोलिसांना सोपे असते. कारण ते थेट पुरावे असतात आणि ज्या फोन नंबरवरून ते पोस्ट केले गेले आहेत ते किंवा इंटरनेट कनेक्शनही लगेचच ठोस पुरावा बनते हे ठाऊक असतानाही, असे धाडस दाखवले जात आहे. दररोज अशा अनेकांना अटक केली जाते आणि तरीही मुले पोस्ट करत राहतात. हिंसक शक्तीचे असे प्रदर्शन समाजात एक फॅशन बनले आहे आणि शाळकरी मुलांपासून ते सोशल मीडियावर त्यांचे रील्स बनवून पोस्ट करणारे तरुण त्यांच्या गुन्ह्यांचे व्हिडीओ ही अभिमानाची गोष्ट मानतात. असे अनेक व्हिडीओ येत असतात ज्यात ही मुलं पिस्तूल आणि चाकू दाखवताना, स्वत:ला डॉन भासवताना दिसतात. यातून हे असेच करण्यासाठी इतर मुलांवर मानसिक दबाव निर्माण केला जात आहे. या अशा स्थितीत व्हिडीओसाठी आणलेले चाकू आणि बंदुका खऱ्या हिंसाचाराचे साधन कधी बनतात, ते कळत नाही.

शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये हिंसाचार वाढण्याची आणखी दोन कारणे आहेत, ज्या राज्यांमध्ये शिक्षणाचा जीवनातील प्रगतीशी फारसा संबंध नाही, तिथे किशोरवयीन मुले, तरुण शाळा आणि महाविद्यालयात जातात खरे, पण त्यांना अभ्यास करण्याची प्रेरणा नसते, नोकरी मिळवण्यासाठी लाच द्यावी लागत असेल तर अभ्यास करण्याचा उपयोग काय, अशा विचारसरणीने जगणाऱ्या मुला-मुलींमध्ये हिंसाचार सहज वाढतो आहे. शिक्षकांचे आता विद्यार्थ्यांशी पूर्वीसारखे संबंध राहिलेले नाहीत. शिक्षकांना वर्ग अभ्यासाच्या पलीकडे कठोर परिश्रम करण्याची आवश्यकता नाही, उलट गृहपाठाच्या मुद्द्यावर शिक्षकांवर गोळीबार करण्यात आला त्यावरून कठोर परिश्रम करण्याचे परिणाम दिसून येतात. शाळांमध्ये समुपदेशक असले पाहिजेत. शिकवण्यासाठी दुसऱ्याला कंत्राटावर ठेवले जाते, मुलींची छेडछाड होते. मग असे शिक्षक विद्यार्थ्यांना हिंसाचाराबद्दल कसे जागरूक करतील? शाळकरी मुले पालकांच्या किंवा शाळेच्याही नियंत्रणाखाली नाहीत. ती त्यांच्या वयाच्या मुलांसोबत वाईट सवयी सहजतेने शिकतात आणि त्यापैकी काहीजण मोठा गुन्हा करतात तेव्हाच पकडले जातात. याच वयातील मुला-मुलींमध्ये लैंगिक गुन्हे घडत आहेत आणि व्हिडीओ बनवून ब्लॅकमेलिंग होत आहे. शाळकरी मुले दररोज मोबाईल फोनच्या मदतीने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अनेक तास घालवत आहेत. तिथे दिसणाऱ्या कंटेंटवर सरकार किंवा समाजाचे कोणतेही नियंत्रण नाही. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, स्कूटर आणि मोटारसायकलवरून शाळेत जाणाऱ्या अल्पवयीन मुलांसाठी हेल्मेट सक्तीची करण्यासारखी साधी गोष्ट लागू होत नाही आणि सरकार त्यावर कोणतीही कारवाई करत नाही. हेल्मेट घालण्यासारख्या लहानशा गोष्टीने कायद्याचा आदर करायला शिकवावे लागेल, अन्यथा ते चाकूहल्ल्यांपर्यंत वाढेल. सरकार, पोलीस आणि न्यायालयाच्या पलीकडे जाऊन याचा विचार करावा लागेल, अन्यथा ही प्रवृत्ती वाढतच जाईल.

# चोरटी येथे शेत जमिनीवर अवैध गौण खनिज उत्खनन

## चोरटीवासियांची पत्रकार परिषदेत माहिती

ब्रह्मपुरी/का.प्र.

मोरेश्वर दादाजी उईके रा. चोरटी यांच्याद्वारे शेत जमिनीवर अवैध गौण खनिज मुरूम उत्खनन करून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविला आहे. परिसरातील पर्यावरणाची मोठी हानी केली आहे. तसेच उत्खनन केलेल्या खड्यात जीवितहानी होण्याची शक्यता असल्यामुळे चौकशी करून गुन्हा नोंदविण्याबाबत चोराटीवाशी ग्रामस्थांनी स्थानिक पत्रकार परिषदेत मागणी केली आहे.

सदर जमीन २ हेक्टर २५ आर ही मोरेश्वर दादाजी उईके यांना केवळ शेती करण्याच्या उद्देशाने भोगवटदार वर्ग २ म्हणून देण्यात आली होती. मात्र त्यांनी या जमिनीचा गैरवापर करत मोठ्या प्रमाणात गौण खनिज मुरूम चे अवैध उत्खनन केले आहे. हे कृत्य कायद्याचे स्पष्ट उल्लंघन आहे. तसेच सदर शेत गावालगत व शाळेजवळ असल्यामुळे उत्खनन केलेल्या जीवघेण्या खड्यात जीवितहानी होण्याची शक्यता आहे. मोरेश्वर दादाजी उईके यांनी कोणतीही अधिकृत परवानगी न घेता शेतीत जेसीबीच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात खोदकाम केले आहे. या खोदकामातून निघालेल्या माती व मुरुमाची बेकायदेशीरपणे विक्री करण्यात येत आहे. हा प्रकार अनेक दिवसांपासून सुरू आहे. यामुळे पर्यावरणाची हानी होत असून, शासनाचे मोठे आर्थिक नुकसानही होत आहे.

यापकरणी गुन्हा नोंद करून चौकशी करून दोष आढळल्यास मोरेश्वर उईके यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच शासनाने जमीन परत घ्यावी अशी मागणी चोरटी ग्रामस्थांनी पत्रकार परिषदेत केली आहे. पत्रकार परिषदेत तीमा भागडकर, राष्टपाल बुराडे, बाळकृष्ण मेश्राम, श्रीराम राऊत, मारोती रामटेके, उद्धव कोरवाते, अशोक राऊत, निर्मल बुराडे, मनिषा बगमारे, लता पारधी, विनोद राऊत व अन्य गावकरी उपस्थित होते.

### आरोप खोटे - मोरेश्वर उईके

**माझ्यावर मुरूमाचे अवैध उत्खनन केल्याचा आरोप खोटा आहे. शेती माझ्या मालकीची असून त्यामध्ये शेततळेसुध्दा आहे. तळ्याचे पाणी वापरून शेती करीत आहे. २५ ऑगस्टला मंडळ अधिकारी यांनी मौका चौकशी केली असता त्यांना उत्खनन झाल्याचे दिसून आले नाही. सामूहिक वन हक्क समितीची अनियमितता उघड केली म्हणून माझ्यावर खोटे आरोप करण्यात येत आहे.**

# महात्मा चक्रधर हे खरे समाजोध्दारक - प्राचार्य डॉ. शेकोकर



ब्रह्मपुरी/का.प्र.

'गुजरातला जन्मलेले परंतु महाराष्ट्र आपली कर्मभूमी समजून समाजात ज्ञानापसी प्रेम उत्तम' हा मंत्र देणारे श्री चक्रधर अहिंसा, भूतदया, समानता, मानवता व वैराग्य शिकवितात. देवगिरीच्या रामदेव राजाची सत्ता महाराष्ट्र असतांना समाजातील अंधश्रद्धा नष्ट करुन आपल्या प्रबोधन तत्वाने समाजकार्य करणारे महात्मा चक्रधर हे खरे समाजोद्धारक होत', असे बहूमूल्य विवेचन प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकरांनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात महात्मा चक्रधर जयंतीनिमित्त बोलत होते.

याप्रसंगी शांताबाई भैया महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव वरभे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व माल्यार्पणाने करण्यात आली. यानंतर डॉ धनराज खानोरकर, डॉ योगेश ठावरी, डॉ किशोर नाकतोडे, डॉ रतन मेश्राम, डॉ युवराज मेश्राम, डॉ पद्माकर वानखडे, प्रा निलिमा रंगारी, डॉ कुलजित शर्मा, डॉ भास्कर लेनगुरे, डॉ सुनिल चौधरी, डॉ विवेक नागभीडकर, प्रा जयेश हजारे, प्रा धिरज आतला, अधीक्षक संगीता ठाकरे, पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर, डॉ ज्योती दुपारे, रोशन डांगे, प्रज्ञा मेश्राम इत्यादींनी प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

संचालन डॉ युवराज मेश्राम तर आभार डॉ धनराज खानोरकरांनी मानले. यशस्वीतेसाठी समिती प्रभारी डॉ शर्मा, जगदिश गुरनुले, प्रदीप रामटेकेंनी सहकार्य केले.


**आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...**

**: कार्यालय पत्ता :**
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी

**: जाहिरातींसाठी संपर्क :**
महेश पिलारे मो. ९५०३१००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७७५३९५


## विनोदिनी

सार्वजनिक बांधकाम विभागातील मंत्र्याची आई अचानक आजारी पडली...
तिला जी उचकी लागली ती थांबेचना.... जीव जातो कि राहतो असे झाले. केस सिरीयस, हॉस्पिटल ला नेल्यावर डॉक्टरांनी चेक केले म्हणाले औषधे देतो पण एक महिना भर हा त्रास होणारच.
मंत्री म्हणाले लवकर फरक पडेल असे काहीतरी करा.
त्यावर डॉक्टर म्हणाले, अहो... हा आजार नाहीच आहे. सध्या गणपतीला बरेच लोक कोकणात चाललेत. रस्त्यात खड्डा आला की ते 'तुमच्या आयची...' आठवण काढतायत म्हणून असे होतेय.
अनंत चतुर्दशी नंतर एक दोन दिवसात फरक पडेल..!!!

# मांगली येथील शाळेतील 'त्या' शिक्षकावर उचित कारवाई होणार...?

## शाळेतील विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण प्रकरण

ब्रह्मपुरी/का.प्र.

शाळेतील शिक्षकांवर पालकांचा खूप विश्वास असतो, त्यामुळेच ते निर्धास्तपणे आपल्या पाल्यांना शाळेत पाठवत असतात. आपली मुलं सुरक्षित राहतील, शिक्षकांकडून त्यांना चांगल्या गोष्टी शिकायल मिळेल असा विश्वासही पालकांना असतो. पण ब्रम्हपुरी तालुक्यातील मांगली गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील एका शिक्षकाने जे केलं ते पाहून कोणाचाही शिक्षक या व्यक्तीवरूनच विश्वास उडेल, त्या विश्वासाला तडा जाईल. मांगली गावातील जि.प.शाळेतील एका शिक्षकाने पहिल्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला अनानुष मारहाण केली आहे. आणि त्यातचं कारण तर अतिशय शुल्लक आहे. स्कूल ची स्पेलिंग सांगता न आल्याने विद्यार्थ्याला अमानुष मारहान करण्यात आली. सदर मारहाण प्रकरणाची मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकिंत सिंग यांनी दखल घेतली असून, तसा अहवाल गटशिक्षणाधिकारी माणिक खुणे यांच्याकडून मागविला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर 'त्या' शिक्षकावर उचीत कारवाई करण्यात येणार आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ब्रम्हपुरी तालुक्यातील मांगली येथील जिल्हा परिषद शाळेत हा भयानक प्रकार घडला आहे. केवळ स्कूल या शब्दाची स्पेलिंग आली नाही म्हणून पहिलीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षकाने अमानुष मारहाण केल्याची घटना दि. १९ ऑगस्ट २०२५ मंगळवारला घडली. ब्रम्हपुरी शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या मांगली गावातील जिल्हा परिषद शाळेत अमानुष मारहाण झालेला तो मुलगा पहिल्या वर्गात शिकतो. काही महिन्यांपूर्वीच त्याने शाळेची पायरी चढली. मात्र त्या मुलासह आठ ते दहा मुलांना शिक्षकांनी विचारलेली स्कूल ची स्पेलिंग सांगता आली नाही, म्हणून त्या शिक्षकांनी त्या मुलासह अन्य विद्यार्थ्यांना मारहाण केली. शिक्षकाच्या भितीमुळे मुलांनी सदर घटना पालकांना सांगितली नाही. दुसऱ्या दिवशी २० ऑगस्ट २०२५ बुधवारला सदर घटना उघडकीस आली. यात त्या अमानुष मारहाण झालेल्या मुलाच्या पाठीवर बरेच व्रण उमटले आहेत. अशा घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा मारकुट्या शिक्षकावर त्वरित कारवाई होणे आवश्यक आहे.

सदर प्रकरण दाबण्यासाठी 'त्या' शिक्षकाकडून आर्थिक बळाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आल्याची चर्चा ब्रम्हपुरी तालुक्यात रंगत आहे. परंतु गावातील पालकांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला. शिक्षकाने विद्यार्थ्याला केलेल्या मारहाणीचे फोटो सोशल मिडीयावर प्रचंड प्रमाणात व्हायरल होत आहे. सदर शिक्षकावर उचीत कारवाई करण्याची मागणी सुज्ञ पालक करीत आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग यांनी आश्विनी सोनवणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सदर प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. आश्विनी सोनवणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या आदेशानुसार, गटशिक्षणाधिकारी माणिक खुणे हे सदर प्रकरणाची प्रत्यक्ष सखोल चौकशी करणार असून तसा अहवाल आश्विनी सोनवणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे सुपूर्द करणार आहेत. त्यानंतर सदर शिक्षकावर उचीत कारवाई होणार असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी माणिक खुणे यांनी आमच्या प्रतिनिधीला दिली.**

## ने.हि. कन्या विद्यालयात तान्हा पोळा उत्साहात साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक २१ /८/ २०२५ रोज गुरुवारला ने.ही. कन्या विद्यालय ब्रह्मपुरी येथे तान्हापोळा



साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम तसेच प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम, ज्येष्ठ शिक्षिका दलाल मॅडम व शेंडे मॅडम उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता व शिवलिंग पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये वर्ग ५ ते ७ वीच्या मुली नंदीबैल सजावट व वेशभूषा करून आल्या होत्या. मान्यवरांच्या हस्ते सर्व उपस्थित नंदीबैलांचे पूजन व माल्यार्पण करून वेशभूषा परीक्षण करण्यात आले. यानंतर सर्व उपस्थित मान्यवर, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी सर्वांनी मिळून महादेवाची आरती करण्यात आली. सर्व नंदीबैल आणलेल्या विद्यार्थिनींनी शंकराच्या पिंडीला दोन रिंगण घातले व यानंतर विद्यार्थिनींना चॉकलेट देण्यात आले .

शाळेच्या पर्यवेक्षिका खंडाते मॅडम यांनी विद्यार्थिनींना पोळ्याचे महत्त्व सांगून त्यांचे कौतुक करून पोळ्याच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षा बनपूरकर मॅडम यांनी पोळा या सणाबद्दल माहिती सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अशा प्रकारे अतिशय आनंदाने व जल्लोषाने कार्यक्रम घेण्यात आला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन भुरे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## शिवाजी चौकात रस्त्यावर तयार झालेली नाली ठरतेय वाहनधारकांसाठी डोकेदुखी



ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील शिवाजी चौक गुजरी परिसर हा मुख्य वर्दळीचा भाग असून येथून दररोज शेकडो वाहने ये-जा करतात. मात्र, या मुख्य रस्त्यावर नालीसारखा खोल गेलेला भाग तयार झाल्यामुळे वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

रस्त्याच्या मधोमध खड्डयासारखा पट्टा पडल्यामुळे दोन चाकी, चार चाकी गाड्या चालविणाऱ्यांना संतुलन राखणे अवघड झाले आहे. अचानक धक्का बसल्याने अपघात होण्याची शक्यता कायम आहे. विशेषत: संध्याकाळच्या गर्दीत हा त्रास अधिक जाणवतो.

स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले असून तात्काळ दुरुस्ती करून रस्ता सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

## अभा मराठी साहित्य परिषदेच्या उपाध्यक्ष पदी डॉ. हर्षे

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील कवी व साहित्यिक प्रा. डॉ. संजय प्रभाकर हर्षे यांची अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या चंद्रपुर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे ही राज्य व देशभरात मराठी भाषा व संस्कृती



संवर्धनासाठी कार्यरत असुन, जिल्हा पातळीवर नेतृत्वाची जबाबदारी आता उपाध्यक्ष म्हणुन प्रा. डॉ. संजय हर्षे यांच्या खांद्यावर आहे. त्यांच्या साहित्यिक, सामाजिक आणि संघटन कौशल्याचा लाभ चंद्रपुर जिल्ह्यातील साहित्य प्रेमींना मिळेल असा विश्वास परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. सामाजिक व साहित्यीक क्षेत्रातील बहुमूल्य योगदानाची दखल घेत अ.भा. मराठी साहित्य परिषद या प्रतिष्ठित संस्थेने, संस्थेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष मा. शुभांगी काळभोर व राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉ. शरद गोरे यांच्या स्वाक्षरीने दि. १५ ऑगष्ट २०२५ रोजी नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

नियुक्ती पत्रानुसार, प्रा. डॉ. संजय हर्षे यांचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत राहणार असून साहित्य परिषदे मार्फत समाज जागृती, साहित्य संवर्धन आणि सांस्कृतीक उपक्रमातून सर्व समाज घटकापर्यंत पोहचून कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या नियुक्ती बद्दल सर्व तालुक्यातील साहित्यिक, कवी, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक कार्यकर्ते व मित्र परिवाराने प्रा. डॉ. संजय हर्षे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत आहेत.

**जल है तो कल है...**

# स्व. अभिजित जगनाडे स्मृती स्वातंत्र्य दिन बुद्धिबळ स्पर्धेचे बक्षीस वितरण

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. १५ ऑगस्ट २०२५ ला भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्य ब्रम्हपुरी तालुका बुद्धिबळ संघटना



ब्रम्हपुरी च्या वतीने 'स्व. अभिजित जगनाडे स्मृती स्वातंत्र्य दिन बुद्धिबळ स्पर्धा -२०२५ 'चे भव्य आयोजन विठ्ठल रुक्मिणी सभागृह ,आरमोरी रोड ब्रम्हपुरी येथे करण्यात आले. स्पर्धेत एकूण १७५ खेळाडूंनी भाग घेतला. स्पर्धेचे प्रयोजक 'स्व.अभिजित जगनाडे स्मृती प्रतिष्ठान ब्रम्हपुरी तर्फे एकूण १५०००/- रुपयाचे रोख बक्षीस व प्रोत्साहन पुरस्कार होते.

स्पर्धेचे उद्घाटन BTCA चे संस्थापक सचिव हरिश्चंद्रजी चोले व पदाधिकारी यांचे हस्ते करण्यात आले. ओपन व विद्यार्थी गटातील सात फेऱ्या पूर्ण करून ५.०० वाजता स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. ओपन गटात-हर्षल भांडारकर प्रथम, सिद्धांत तायडे द्वितीय व उमेश सहारे तृतीय, तसेच विद्यार्थी गटात - विहान सुर्यवंशी प्रथम, कनिष्क इंदुरकर द्वितीय, ओजस भोयर तृतीय पुरस्काराचे मानकरी ठरले.

दोन्हीही गटात प्रथम क्रमांकास स्पर्धा ट्राफी, १२-१२ रोख पुरस्कार व ५-५ प्रोत्साहन पुरस्कार देऊन खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. बक्षिस समारंभाचे अध्यक्ष विठ्ठलरावजी निशाने माजी बि.डी.ओ.ब्रम्हपुरी, बक्षीस वितरक व प्रमुख मार्गदर्शक मान.प्रा.दिलिपजी जगनाडे ब्रम्हपुरी, तसेच प्रमूख अतिथी मनोहरराव बनवाडे माजी भाग शिक्षणाधिकारी यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून बक्षीस वितरण केले. स्पर्धा संयोजक आदित्य दुफारे, मुख्य ऑरबिटर रितेश उरकुडे, निलेश बांडे, वेदांत बांडे व प्रकाश वैद्य, मुकूल बरडे यांनी योग्य नियोजन करून स्पर्धा यशस्वी केली.

अतिथी परिचय व प्रास्ताविक तुळशीरामजी सपाटे सचिव यांनी केले तर मुनीराज कुथे यांनी संचालन व दशरथ बांडे अध्यक्ष यांनी आभार प्रदर्शन केले. हरिश्चंद्रजी चोले संस्थापक सचिव, संजय देव सर, महादेवजी दर्वे, दामोधर बावनकुळे, विनोबाजी मेश्राम, झुबेर राय्यानी, उत्तम कोसे, प्रा. मनिषा गेडाम , मोरेश्वर राऊत व BTCA चे सर्व पदाधिकारी, सदस्य व सर्व खेळाडू पालक यांचे उपस्थितीत स्पर्धेची सांगता करण्यात आली.

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये 'अवर नेशन अवर प्रोफेशन' कार्यक्रम




ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये 'our nation our profession' या स्पर्धेचे आयोजन दि. १३ ऑगष्ट २०२५ ला करण्यात आले होते. हि स्पर्धा प्रि-स्कुल विभागातील विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी मुलांनी सोशल वर्कस जसे डॉक्टर, टेलर, चांभार, शेतकरी, शिक्षक, गुप्तहेर, पायलट, वकील, न्हावी, इंजिनीयर, पोलीस, कलाकार, व्यापारी, अंतरिक्ष यात्री इत्यादी वेगवेगळ्या वेशभूषेत येऊन त्यांनी या वेगवेगळ्या भुमिकांची माहिती प्रदर्शित केली. या भूमिकांप्रती आदर निर्माण व्हावा यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. समुदाय मदतनीस या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या कलात्मक गुणांचा विकास साधण्याचा शाळेचा हा छोटासा प्रयत्न होता.

या स्पर्धेचे मुल्यांकन स्मिता जिभकाटे मॅडम आणि विद्या महाजन मॅडम यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सर्व प्रि-स्कुलच्या शिक्षिकांनी व परिचारिकांनी आपले योगदान दिले. सदर कार्यक्रमाला शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम प्रामुख्याने उपस्थित होत्या.

# राज्यस्तरीय काव्यस्पर्धेत डॉ. खानोरकरांना प्रथम पारितोषिक

ब्रह्मपुरी/का.प्र.

झाडीबोली साहित्य मंडळ, चिमूरच्या वतीने भव्य राज्यस्तरीय काव्यस्पर्धेचे आयोजन केले गले होते. या काव्यस्पर्धेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. ७१ कवींनी या स्पर्धेत राज्यातून सहभाग नोंदवला. या काव्यस्पर्धेचा निकाल तज्ज्ञांनी नुकताच जाहीर केला.



यात प्रथम क्रमांकांचे मानकरी ब्रह्मपुरीचे सुप्रसिद्ध लेखक व कवी डॉ. धनराज खानोरकर यांच्या 'माय' कवितेला प्राप्त झाला असून त्यांचे पांच कवितासंग्रह व लोकप्रिय 'संजोरी' ललितबंध व संपादित ग्रंथसंपदा प्रकाशित आहे. द्वितीय क्रमांक सुनिल पोटे, राजुरा यांच्या 'निळसर पृथ्वी' या कवितेला तर तृतीय क्रमांक सविता झाडे-पिसे, चिमूर यांच्या 'तुंबल्या गटारी' कवितेला आणि उत्तेजनार्थ पारितोषिक संदिप गायकवाड, नागपूरच्या 'बुद्ध' कवितेला व अरुण घोरपडे, चंद्रपूरच्या 'झाडे जगवा झाडे लावा' कवितेला प्राप्त झाला आहे.

पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे असून पारितोषिक वितरण एका शानदार समारंभात करण्यात येईल, असे झाडीबोली साहित्य मंडळ, चिमूर तालुका अध्यक्ष प्रकाश कोडापे, सचिव आनंद बोरकर, सल्लागार सुरेश डांगेंनी कळविले आहे.

# संत शिरोमणी सेनानी महाराज पुण्यतिथी




ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी येथे महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने संत शिरोमणी सेनानी महाराज यांची पुण्यतिथी सोहळा आयोजित करण्यात आला होता.

सर्वप्रथम महाराज्यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मान्यवरांनी संत शिरोमणी सेनानी महाराजां विषयी विचार व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाला महामंडळाचे पूर्व विदर्भ अध्यक्ष डॉ. प्रा. अशोक सालोटकर, पूर्व विदर्भ संघटक घनश्याम सुर्यवंशी, पूर्व विदर्भ संघटन सचिव प्रदिप मेश्राम, प्रभावती शेंद्रे, उदय पगाडे तालुका सचिव, प्रकाश पगाडे सदस्य, रजनी सुर्यवंशी महिला प्रतिनिधी, शुभांगी शेंद्रे महिला प्रतिनिधी व बंधू -भगिनीं, बाल-गोपाल, युवा -युवती, ज्येष्ठ मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व समाज बांधवांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने करण्यात आली.

# जीवन ज्योती विमा धनादेशाचे लाभार्थ्यांना वितरण



ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतीय स्टेट बँक शाखेच्या जीवन ज्योती विमा पॉलिसी योजनेअंतर्गत विमा पॉलिसी धारक तुळशीदास कामडी, अतुल धोटे, आशा सुरेश बनकर राहणार पिंपळगांव (भोसले )यांचा आकस्मिक मृत्यू झाल्यामुळे मयताच्या वारसांना उर्मिला तुळशीदास कामडी, विद्या अतुल धोटे, सुरेश सोमाजी बनकर यांना भारतीय स्टेट बँक शाखा, अऱ्हेरनवरगांव चे शाखा व्यवस्थापक पराग तेलंग यांनी प्रत्येकी दोन लाख रुपयाचे धनादेश दिले.

यावेळी बँकेचे कर्मचारी सतीश कुर्वे, शरद तलमले, सुरक्षा रक्षक संजय उईके , सीएससी सेंटर संचालिका किरण तलमले व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. जीवन ज्योती विमा पॉलिसी अंतर्गत मिळालेल्या दोन लाख रुपयाच्या धनादेशाबद्दल उर्मिला कांबडी, विद्या धोटे, सुरेश बनकर यांनी भारतीय स्टेट बँकेचे आभार मानले.

# ब्रम्हपुरीत तान्हा पोळा उत्साहात साजरा



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील बाजार चौकातील महादेव मंदिर परिसरात ऐतिहासिक वारसा व परंपरागत तान्हा पोळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी या तान्हा पोळ्यात सहभाग घेतला.

सुरवातीला दु. ३ वा. पासून बालगोपालानी या ठिकाणी नंदीबैल आणून मंदीराला प्रदक्षिणा घातल्या. सायंकाळी ६ वाजल्यापासून मोठे लाकडी नंदी बैल वाजत गाजत आले. यावेळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे थोडा वेळ गर्दी पांगली. काही वेळाने त्याच उत्साहात नंदी बैल येणे सुरू झाले. यात जाणी परीवाराच्या काळी बैलजोडी चा सहभाग होता. घरगुती मोठे नंदीबैल नंतर रेणूका मंदीर, संत रविदास महाराज मंदिर, धुमनखेडा वार्डातील गणपती मंदिर येथील नंदी बैल आकर्षक सजावट व डि. जे. ढोलताशाच्या गजरात मिरवणूकीने आले. रात्री १० वा. पर्यंत तान्हा पोळा धुमधाम सुरू होती.

शहरातील देलनवाडी, गांधीनगर, कुरझा प्रभाग, पेठ वार्ड, शिवनगर आदी ठिकाणासह अनेक शाळांमधील तान्हा पोळ्यात विद्यार्थी सहभागी झाले.

# विनोद झोडगे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

ब्रम्हपुरी/का.प्र.

देशातील शोषित ,वंचित असंघटित, कामगार, मजदुर यांच्या हक्कासाठि, न्यायासाठी जमिनीवर उतरून कार्य करणारे सर्व समावेशक पार्टी भारतीय कम्युनिस्ट पार्टी. निरंतर लोकांचे हित जोपासणारी चळवळ व चळवळीतील कार्यकर्ते डोळयात अंजन टाकून काम करीत असतात.




भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे अनेक चळवळीचे कार्यकर्ते निर्माण करण्याची किमया ब्रह्मपुरी तालुक्यात कॉ.विनोद झोडगे पाटील यांनी केली. व पार्टीचे अनेक पदे भूषविली. ब्रम्हपुरी हे तालुक्याचे मुख्यालय आहे तहसील कार्यालय, पंचायत समिति व अन्य शासकीय कार्यालय आहेत त्यामुळे ब्रम्हपुरी पासून ४० ते ५० कि.मी. अंतरावरील गावकऱ्यांना आपल्या समस्या घेऊन न्याय मागण्यासाठी धाव घ्यावी लागते. ही अडचण लक्षात घेता तद्वतच ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी मजूर, महिला व असंघटित कामगार यांच्या समस्येचे निराकरण व्हावे म्हणून भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे जिल्हा सहसचिव तथा राज्य कौन्सिल सदस्य कॉ.विनोद झोडगे पाटील यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोहळा गांगलवाडी येथे पार पडला.

या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. डॉ.महेश कोपुलवार, डॉ. भूषण भोयर, माजी जिल्हा परिषद सदस्य दादा सातपुते यांच्या हस्ते करण्यात आले.

विशेष म्हणजे या उद्घाटन सोहळ्या करिता विविध सामाजिक संघटना, पक्षाचे मान्यवर ज्यात संजय भोयर ग्राम पंचायत सदस्य, मनोहर भर्रे उपसरपंच, प्रशांत डांगे, पद्माकर रामटेके खोरीप, ईश्वर ठाकरे माजी सरपंच, विनोद पाटील, महेश पानसे, संजय वाकडे, प्रकाश खोब्रागडे, चुनीलाल मोटघरे, धनराज ठाकरे, सुधाकर ठाकरे, मालवी सर, विक्की उरकुडे, प्रदीप नखाते आदी उपस्थित होते.

# जुगनाळा शाळेत नंदीबैल सजावट स्पर्धेचे आयोजन

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या स्थानिक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक जुगनाळा येथे बैलपोळा व नंदी बैलपोळयाचे औचित्य साधत नंदीबैल सजावट स्पर्धेचे आयोजन दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपापल्या नंदी बैलाला सजवून या स्पर्धेत मोठया संख्येने सहभाग दर्शविला.

सदर स्पर्धेचे परीक्षण नागभीडचे शिक्षण विस्तार अधिकारी भंडारे मॅडम यांनी केले. सहभागी नंदीबैला मधून उत्कृष्ठ तीन नंदी निवडण्यात आले. तसेच सर्व सहभागी नंदी धारक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष गजानन प्रधान सर, प्रमुख बक्षीस वितरक म्हणून धनपाल दमके, प्रभा गणवीर, संगीता वैद्य, स्वाती लाडेकर ह्या होत्या.

सूत्र संचालन गोवर्धन टिकले सर तर आभार प्रदर्शन योगराज बोरकुटे सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंद तथा विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

झाडे लावा,
झाडे जगवा...

# ब्रम्हपुरी योग समितीतर्फे वृक्षारोपण

ब्रम्हपुरी/का.प्र.

आज पर्यावरणाचे संतुलन बिघडलेल आहे. ऋतूंचा क्रम बदललेला आहे. वृक्षांची फार आली. तसेच तेथील विद्यार्थी व कर्मचारी वृंद यांना योग प्राणायाम चे महत्व यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यात अनिल




मोठ्या प्रमाणात कत्तल सुरू आहे त्यामुळे पाऊस नियमित पडत नाही. अशा वेळी वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे.

या उदात्त हेतूने ब्रम्हपुरी योग समितीने आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, खेड रोड इथे वृक्षारोपण घेण्याचे ठरविले आणि आज सकाळी सात वाजता वसतिगृहाचे मुख्य अधिक्षक नातराम साहेब यांचे नेतृत्वात वृक्षारोपण करण्यात आले. यात मुख्यतः फळांची झाडे लावण्यात

चिलमवार अध्यक्ष, भागवत सर, गजानन बुरले, जुमडे सर, गोडे सर यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना जुमडे यांनी केली तर संचालन संजय काकडे व आभारप्रदर्शन धोरूडे सर यांनी केले. या प्रसंगी योग समिती चे ठाकरे, देशमुख, मुळे, कोरनकर, घनश्याम कावळे हे उपस्थित होते. या प्रसंगी वसतिगृहाचे अधिक्षक नातराम साहेब त्यांचे कर्मचारी, विद्यार्थी यांचें विशेष सहकार्य लाभले.

# प्रा. अतुल अंबादे आचार्य पदवीने सन्मानित

ब्रह्मपुरी/का.प्र.



येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील अंशकालीन प्रा.अतुल तुलाराम अंबादे यांना गोंडवाना विद्यापीठाने राज्यशास्त्र विषयात नुकतीच आचार्य पदवी बहाल केली.

त्यांनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील डॉ. एल.एच. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली 'महाराष्ट्रातील ग्रामीण विकास प्रक्रियेत पंचायत समितीचे योगदान – संदर्भ चंद्रपूर जिल्हा' या विषयावर आपला प्रबंध विद्यापीठाला नोव्हेंबर २०२४ ला सादर केला होता. त्यांना ऑगस्ट २०२५ ला विद्यापीठाने आचार्य पदवीने सन्मानित केले.

❁❁❁❁❁❁

... QUOTES ...

"Success is a lousy teacher. It seduces smart people into thinking they can't lose."
- Bill Gates

चारोळी

निसर्गापासून दूर जाऊन
प्रगती होणार नाही...
जी झाली तिला प्रगती म्हणायला,
आपली हरकत नाही...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरीच्या विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय बुध्दिबळ स्पर्धेत सुयश



दिप्तांशी गवाल | उत्कर्ष नाकाडे | शरव वानखेडे | प्रियांशी खोब्रागडे | सार्थ लेनगुरे

ब्रम्हपुरी/का. प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची सोमवार, दि १८ ऑगस्ट २०२५ ला पार पडलेल्या तालुकास्तरीय बुध्दिबळ स्पर्धा जिंकून जिल्हास्तरीय बुध्दिबळ स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास होण्याकरिता विविध स्पर्धा परिक्षांचे आयोजन स्कुलमध्ये करण्यात येते. अशा विविध स्पर्धा परिक्षेत बहुतांश विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले.

तालुकास्तरीय बुध्दिबळ स्पर्धा २०२५-२६ यामध्ये १४ वर्ष वयोगटात मुलांमधून शरव वानखेडे याने दुसरा कमांक तसेच १४ वर्ष वयोगटात मुलींमधून दिप्तांशी गवल हिने तिसरा क्रमांक प्राप्त केला. त्याच प्रमाणे १७ वर्ष वयोगटातील सार्थ लेनगुरे याने तिसरा क्रमांक तसेच १७ वर्ष वयोगटात मुलींमधून प्रियांशी खोब्रागडे हिने पहिला क्रमांक पटकावून घवघवीत यश प्राप्त केले आहे.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल एल. एम. बी. पब्लिक स्कुलचे अध्यक्ष तथा ने. हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांचेसह शिक्षक व कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# निष्ठूर नियतीच्या डावामुळे दोन...

(पान क्र. १ वरून)

ती अंथरुणाला खिळली. माय वैशाली अंथरुणावर खितपत पडल्याचे पाहून, प्राजक्ता व शुभ्रा ह्या निरागस मुली मायेजवळून हटत नव्हत्या. वैशालीची प्रकृती अधिकच खालावली. त्यामुळे तिला ब्रम्हपुरीतील ख्रिस्तानंद रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु निष्ठूर नियतीच्या मनात काही वेगळेच होते. डॉक्टरांनी बरेच उपचार केले, पण त्याचा काहीच फायदा झाला नाही. दोन दिवसांच्या आजारपणात वैशालीचा रुग्णालयात मृत्यू झाला. तो बैल पोळ्याचा दिवस होता. शेतकऱ्यांच्या आनंदाचा सण बैल पोळा, गावात सर्वत्र साजरा केला जात असताना, वैशालीच्या जाण्यामुळे ठेंगरे कुटुंबियांवर मात्र दुःखाचा डोंगर कोसळला. प्राजक्ता व शुभ्रा ह्या दोन्ही निरागस मुलींना सोडून वैशाली हे जग सोडून फार दूर गेली. दोन्ही मुलीं माय सोडून गेल्यामुळे ओक्सा-बोक्शी रडत होत्या. घराजवळचे सगळे लोक वैशालीच्या अशा अचानक जाण्यामुळे हळहळत होते. प्रत्येकाच्या मुखात त्या दोन मुली पोरक्या झाल्याचे भाव होते. आई-वडिलांच्या जाण्यामुळे दोन्ही मुली पोरक्या झाल्या. त्यांचा सांभाळ करण्यासाठी घरात आजी आजोबा आहेत, पण ते सुद्धा म्हातारे.

# लोकमान्य टिळक विद्यालयातील विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय जलतरण क्रिडा स्पर्धेत सुयश





ब्रम्हपुरी/का.प्र.


चंद्रपूर या ठिकाणी झालेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत लोकमान्य ट्िळक विद्यालय, ब्रम्हपुरीच्या विद्यार्थ्यांनी यश संपादित केले.

येथील इयत्ता ९ वी चा विदयार्थी अथर्व युगेश रणदिवे याने १७ वर्ष वयोगटात जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत १०० मीटर फ्री स्टाईल तसेच ५० मीटर फ्री स्टाईल इव्हेंट मध्ये १७ वर्षे वयोगटात व्दितीय क्रमांक पटकाविला तसेच ५० मीटर बॅकस्ट्रोक या इव्हेंट मध्ये प्रथम क्रमांक पटकाविला असून त्याची विभाग स्तरावर जलतरण स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. यात यशात अथर्वला क्रिडा शिक्षकांचे योगदान लाभले. या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, ब्रम्हपुरीचे अध्यक्ष प्रा. अतुलभाऊ देशकर, संस्थेचे सचिव प्रा. सतीशजी शीनखेडे व इतर संचालक मंडळ तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विलास धोंगडे सर, उपप्राचार्य रवी पेशटटीवार सर तसेच पर्यवेक्षिका प्राजक्ता चिंचाळकर मॅडम, प्रा प्रशांत मत्ते सर, पराग भांडारकर, शिक्षक/शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच शाळा परिवारातर्फे अभिनंदन करण्यात आले व पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या.

Miracle constructions
& Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



सोरते
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.





# नेवजाबाई भैया हितकारिणी सार्वजनिक...

(पान क्र. १ वरून)

मूर्तीचे पवित्र अबाधित राखण्यासाठी मंडळाचे पदाधिकारी कार्यमग्न राहणार आहेत. नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्थेच्या परिसरात यावर्षी भव्य आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. आकर्षक मूर्ती आणि प्रेक्षणीय चित्रफिती स्वरूपात देखावा यासाठी हे मंडळ प्रसिद्ध आहे. मंडळाने लोकांच्या मनोरंजनासाठी व ईश्वर भक्तीभावासाठी वातावरण निर्माण केलेले आहे. त्यामुळे बाहेरगावी कामानिमित्त गेलेले चाकरमानी मोठ्या संख्येने आपापल्या गावात दाखल होत आहेत. शहरातील बाजारपेठाही खरेदीसाठी हाऊसफुल्ल झाल्या असल्याचे पहावयास मिळत आहे. महिनाभरापासूनच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची बाप्पांच्या आगमणासाठी लगबग सुरू होती.

वातावरण आणि उन्हाचे चटके दिवसभर ढगाळ सहन करत अनेक सार्वजनिक गणेश मंडळांनी आपल्या लाडक्या बाप्पांचे जल्लोषात स्वागत केले आहे. येत्या दहा दिवसांपर्यंत प्रत्येक घराघरात आरती, स्त्रोत, भजन, मंत्रपठण असे मंगलमय वातावरण पहावयास मिळणार आहे. 'श्रीं'च्या आगमणाने बच्चे कंपनी व अबालवृद्धांचा आनंद नक्कीच द्विगुणीत झाला आहे. नेवजाबाई भैया हितकारिणी सार्वजनिक गणेश मंडळाच्या बाप्पांची पहिली छबी टिपण्यासाठी तर काही ठिकाणी बाप्पांसोबत सेल्फी काढण्यासाठी तरूणांची झुंबड उडली.

बुधवार बंद
- दुकानाची वेळ -
सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404